Vol 3 Issue1 Feb 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

शिवकालीन महाराष्ट्रातील सावकारी

प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

सारांश

शिवपूर्व सातवाहन, यादव, मोगलकाळातील सावकारीचे स्वरूप हे व्यापारी श्रेणी व पेढीवाले यांच्या माध्यमातून दिसून येते. पुरातन काळापासून सावकार या ना त्या रूपात राष्ट्राचा उपयुक्त घटक मानला गेला आहे. राजे, महाराजे व सरदार या सावकारांच्या मानमरातब राखत असत.

प्रस्तावना :—

मराठकालीन सावकारीचे स्वरूप पाहत असताना, मराठकाळातही सावकारशाही अस्तित्वात होती असे 'आज्ञापत्रा'तून आणि ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते.

ठेवी स्विकारणे, व्याजाने पैसे कर्जाऊ देणे ही जी पतपेढीची प्रमुख कामे असतात. तशा तऱ्हेच्या पतपेढया अथवा बँका शिवकाळात होत्या असे म्हणता येणार नाही पण स्थानिक धनवान मंडळी गरजूंना जमीन किंवा दागिन्यांच्या तारणावर व्याजबट्टयाचा व्यवहार करीत असावेत. महाराष्ट्रात शेटे महाजन, देशपांडे आणि काही ब्राह्मण मंडळी हा सावकारीचा धंदा करीत असत. ऋणको आणि धनको यांच्यामध्ये परस्परांना मान्य अशी बोलणी झाली म्हणजे कर्जासंबंधीचा कागद तयार होई. त्यास 'कर्जकतबा', 'कर्जरोखा' अथवा 'कर्जपत्र' असे म्हणत. कर्जासंबंधी उभयतामध्ये झालेला हा लेखी करार होय.

'राजश्री महादजीपंत देसकुलकर्णी (म्हणजेच देशपांडे) पा। (परगणे) सिखल गो। (गोसावी) सेवेसी गुणाजी अडवल व बापुजी निगडे पुज मौजे अजनुज पत्र सिखल सु।। समान सितैन अलफ कारणे लिहून दिल्ला कर्ज कतबा यैसाजे तुम्हापासून कर्ज घेतले. होनू 51 येकावन हे छ 22 रविलोवल लाा 7 माहे रबिलावरी देऊन लिहिले. मुदतीस पैके नेदी तरी दरमाहे दर होनास कलातर रूके .||. प्रमाणे झाले मुदलीचे देईन हा कतबा सई.

हे सदरहू मुदतीस पैकचे उगवणीस धणी गोमाजी त्रिमल कुलकर्णी मौजे भाा इ (मजकूर)1

रमाजी ठाकूर

गोही (साक्षीदार)
विसाजी नानाजी कुलकर्णी
मौजे पारगाऊ

वरील 1667 च्या या अस्सल कर्जकतब्यावरून त्यात कशा प्रकारचा तपशील येत असे, याची कल्पना येईल. यात धनको, ऋणको, मुद्दल, व्याजाचा दर, मुदत, मुदतीत कर्जफेड न केल्यास द्यावयाचा दंड, जामीनदार, साक्षीदार या सर्व बाबींचा उल्लेख आहे. काही कर्ज कतब्यांतून कर्जाचे कारणही दिलेले आढळते. एखाद्या ऋणकोबद्दल सावकाराला विश्वास वाटत नसल्यास कोणीतरी जामीनदाराच्या मध्यस्थीने ते कर्ज दिले जाई आणि अशा कर्जकतब्यात त्या व्यक्तीचे नाव स्पष्टपणे घातलेले असे. साक्षीदारांच्या सहयाशिवाय कोणताही कर्ज कतबा पूर्ण होत नसे. साक्षीदारांची संख्या ही कर्जकतब्यात उल्लेखिलेल्या मालमत्तेच्या स्वरूपावर अवलंबून असे. त्यामुळे दोनपासून नऊपर्यंत साक्षीदार कर्जकतब्यावर आढळतात. कर्ज हे नित्याच्या स्वरूपाचे अथवा विशेष गुंतागुंतीचे नसेल तर गावचे पाटील, कुलकर्णी

अथवा इतर एखाद्या गावच्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या साक्षीवर काम भागत असे. पण एखाद्याने आपले मिरासी वतन हकलाजिमास गहाण टाकावयाचे ठरविले तर त्यासाठी कर्जकतब्यावर साक्षीदार म्हणून सही करण्यास बरेच लोक लागत. उदा 1771 सालच्या एका वरील प्रकारच्या कागदावर देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, नाईकवाडी, जोशी, पानसरे, डांगी इत्यादी अनेक व्यक्तीची साक्षीदारांच्या यादीत नोंद आहे.[2]

अशी खबरदारी घेण्याचे मुख्य कारण म्हणजे मिरासी वतन हे वंशपरंपरेने चालत असल्याने कोणाचे कसे संबंध त्यात गुंतले असतील हे सांगता येणे कठीण असे. शिवाय वतनदार हा गावचा अधिकारी असे आणि वतनाच्या साऱ्या व्यवहारावर गावची संमती असावी लागे. अशा प्रकारची संमती ही साक्षीदारांच्या द्वारे घेतली जात होती. तसेच निःसंदिग्ध शब्दांत हा कर्जकतबा आपण कसल्याही दडपणाखाली नाही तर स्वखुशीने केला आहे अशी लेखी कबुली द्यावी लागे.

मराठी माणसाला 'वतन' प्राणाहून प्रिय असल्याने त्यासाठी हवा तो स्वार्थत्याग करावयास तो तयार असे. मराठी कागदपत्रातून वतनाच्या दीर्घकाळ चाललेल्या अनेक खटल्यांची माहिती येते. या खटल्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतले जाई असे कर्ज सामान्यतः देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी ही वतनदार मंडळी कोर्टकचेऱ्यासाठी सावकारांकडून कर्ज घेत असत. दुष्काळ, अवर्षण आणि काही वैयक्तिक संकटकाळी लोक कर्ज काढताना दिसतात. सुगीत परत करण्याच्या बोलीने जेव्हा कर्ज घेतले जात असे ते प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी असे. काही वेळा असे कर्ज धान्याच्या स्वरूपात घेण्यात येई. सामान्यतः असे कर्ज गावच्या जमिनदाराकडून किंवा सावकारांकडून घेतले जाई. पण ते शक्य नसेल तर इतर ठिकाणच्या सावकाराकडून घेतले जाई. अशा वेळेस धनकोने घातलेल्या मुदतीत त्याची परतफेड करावी लागत असे. काही वेळा आपल्या एखाद्या व्यक्तीची शत्रूच्या कैदेतून मुक्तता करून घेण्यासाठी किंवा खंडणी देण्यासाठी तातडीने कर्ज काढावे लागे. राणापूरच्या एका शेतकरी कुटुंबातील काही व्यक्तींना सिद्दीखान याने पळवून नेले व ओलीस ठेवले. त्या कुणब्याने गावच्या शेणव्याकडे 210 रूपयाला जामीन राहण्याची म्हणजे तेवढे कर्ज देण्याची विनंती केली. कारण आपल्या कुटुंबियांची मुक्तता करण्यासाठी तेवढया रकमेचा भरणा सिद्दीखानकडे करणे आवश्यक होते. कुणब्याने तेवढी रक्कम आणि किरकोळ खर्चासाठी अधिक दहा रूपये असे एकूण 220 रूपयांचे कर्ज शेणव्याकडून घेतले. 3

बजाजी नाईक निंबाळकर आणि सावित्रीबाई महादेव निंबाळकर यांनी संयुक्तपणे मलवडीच्या सावकाराकडून साठ हजार होन कर्ज काढले. विजापूरचा सरदार अफजलखान याने बजाजीला शिवाजी राजाचा सहकारी या संशयाने अटक केली होती. बजाजीने आपण निर्दोष आहोत आणि सुटकेसाठी 60,000 होन देण्यास राजी आहोत असा कबुलीजबाब दिल्यावर आणि नाईकजी राजे पांढरे या दुसऱ्या एका मराठी सरदाराने जामीन राहण्याचे कबूल केल्यानंतरच अफजलखानाने त्याची सुटका केली.[4]

रामचंद्रपंत अमात्याने शिवाजी महाराजांपासून तीन पिढयांपर्यंतच्या राजकीय घडामोडी पाहिल्या होत्या व त्यात प्रामुख्याने भागही घेतला होता. त्यांनी मराठकालीन सावकारी व्यवहारासंबंधी लिहिले आहे की,

''साहुकार म्हणजे राज्याची व राजोश्रीची शोभा. साहुकाराच्या योगाने राज्य अबादान होते. न मिळे त्या वस्तु जात राज्यात येतात. ते राज्य श्रीमंत होते. पडले संकट प्रसंगी पाहिजे ते कर्जवान मिळते. तेणेकरून आले संकट परिहार होते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे. याकरीता सावकाराचा बहुमान चालवावा. कोणेविषयी त्याजवर जलाल अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा. पेठात दुकाने, वखारा घालवून हत्ती, घोडे, जरमिना, पशामी आदि करून वस्त्रजात, रत्ने, शस्त्रे आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूर बाजारामध्ये हे थोर–थोर साहुकार आणून ठेवावे. वर्षसंबंधे तसेच लग्नादि महोत्साही हि त्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेने बोलावून आणून वस्त्रपात्र देवून समाधान करित जावे. परमुलखी जे जे सावकार असतील त्यांची समाधाने करून आणावे. त्यास अनुकूल न पडेच तर असतील तेथेच त्याचे समाधान रक्षून आपली माया लावून त्यांचे मुतालीक आणवनू यास अनुकूल जागा दुकाने देऊन ठेवावे. तसेच दर्यावर्दी सावकार यांस हि बंदरोबंदरी कौल पाठवून आमदरफती करावी. साहुकारामध्ये फिरंगी व इंग्रज व वलंदेज व फराशीस व डिगंमारादि टोपीकर हे हि लोक साहुकारी करितात. परंतु वरकड सावकारासारखे नव्हेत. यांचे खावंद प्रत्येक राज्यच करित आहेत. त्यांचे हुकूनामे त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती साहुकारीस येतात. राज्य कारणारास स्थळ लोभ नाही असे काय घडो पाहते ?

तथापि टोपीकरास या प्रांती प्रवेश करावा, राज्य वाढवावे, स्वमतें प्रतिष्ठावी, हा पूर्णाभिमान तद्नुरूप स्थळोस्थळी कृतकार्य हि जाले त्यास ही हट्टी जात, हातात आले स्थळ मेल्याने सोडावयाचे नव्हेत. यांची आमदरफ्ती आले गेले इतकीच असू द्यावी. त्यास केवळ नेहमी जागा कधीही देऊ नये. जंजिऱ्या समीप तों या लोकांचे येणे जाणे सहसा होऊ देऊ नये. कदाचित वखारीस जागा देणे जाली तर दिल्याने जोपर्यंत आपले मर्यादेने आहेत तो आहेत नाही ते समयी आरमार, तोफा, दारूगोळा हेच त्यांचे बळ, आरमार पाठीशी देऊन त्यांचे बळ त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार तेव्हा इतके स्थळ राज्यांतून गेले. याकरितां जागा देणेच तर लांब खाडी गाव दोन गावें राजापुरी सारखी असेल तेथे फराशिसास जागा दिल्हा होता. त्या न्याये दोन चार नामांकित थोर शहरें असतील त्यामध्ये जागा द्यावा. तो असा की तीच जागा शहराचे अहारी शहराचा उपद्रव चुकवून नेऊन वखारा घालाव्या. त्यास इमारतीचे घर बांधू देऊ नये. या प्रकारे राहिले तर बरे नाही तर याविणे प्रयोजन नाही. आले गेले असून त्यांचे वाटे आपण न जावे, आपले वाटे त्यांनी न जावें इतकेच पुरे. गनीमाचे मुलखातील गनीमाचा मुलुख मारिले यामुळे अथवा दर्यावर्दीमुळे साहुकार सापडले तर अवसर पाहून त्यांशी खंड करावा. खंडाचा वसूल घेणे तो हि त्यास राखून घ्यावा. खंड फारीक पावून द्यावे. गनीमाकडील सेवक लोकांस

जे शासन आहे ते सावकार लोकांस उचित नाही.

आज्ञापत्रात ज्या साहुकारांचा उल्लेख केला आहे ते व्याजबट्टयाचा व्यवहार करणारे सामान्य सावकार नव्हते. राज्यात बाजारपेठ बसवून त्या राज्याचा आर्थिक विकास साधणारे ते भांडवलदार होते. प्रसंगी आपल्या गरजा भागविण्यासाठी अशा भांडवलदाराकडून कर्ज घ्यावे लागत आहे. 17 व्या शतकात मराठी माणसे व्यापारात गुंतलेली दिसत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे कर्ज कतबे अभावानेच आढळतात. गावचे वाणी अथवा चिल्लर व्यापारी हे जमिनदार अथवा शेटे, महाजन यांच्याकडून पैशाच्या अथवा धान्याच्या रूपाने कर्ज घेऊन आपला धंदा करीत असावेत.[6]

कुणब्यांमध्ये (शेतकरी) ''आखाडी'' हा दुष्काळाला प्रतिशब्द आहे. यावरून आषाढाचा महिना कुणब्यांना नेहमी जाचक असावा असे अनुमान करण्यास हरकत नाही. यावेळी कुणबी बहुधा खावटीसाठी वाढीने धान्य आणत आणि दुकानदार जुने किडले धान्य त्यांच्या माथी मारून रासमाथ्याला एकदाणी नवे धान्य दिडीने क्वचित दुणीने परत घेत. ज्याच्याजवळ वैरण व बैल नसत ते कमीत कमी दोहात्रा व्याजाने कर्ज काढून बैल वैरण घेत. कर्ज मिळविण्याइतकी तर ते दुसऱ्या कुणब्यांशी 'खांदोडी' करत. त्यायोगाने त्याला बैल उसनवार मिळून त्याबद्दल बैलांच्या मालकाला धान्य, पैसे किंवा आपले बैल परत उसनवार द्यावे लागत. अशा रीतीने कित्येक कुणबी जमिनींना पाळी गोपाळी घालत.

बऱ्याच शेतकऱ्यांना बी विकत आणावे लागत ते कुणब्यांजवळून अगर वाण्यांजवळून आणत. अर्थातच धान्यापेक्षा दुप्पट, तिप्पट क्वचित चौपटही महाग मिळत. बी रोखीने किंवा दुणीने विकत. पीक तयार होते न होते तोच पट्टीचा हफ्ता येऊन धडकत आणि व्यापारीही आपले देणे वसूल करण्यासाठी व धान्याचा सट्टा करण्यासाठी टपलेले असत. अनेक युरोपियन मंडळीसुद्धा शेतकऱ्यांना आगाऊ पैसे देऊन कपाशी गळीतासारखे अमूकच पीक करावयाला लावत व उभी पिके खुडून घेत. शेतकरी नडलेले व निराधार असत. त्यांना बाजारभाव माहीत नसत. व जनमापांची गुंतागुंत उकलणे त्यांच्याच काय पण शिकल्या सवरल्यांच्याही आवाक्याबाहेर असे. शिवाय ज्यांना माल विकायचा त्यांचा विसार त्यांनी घेतलेला असे किंवा त्यांच्याशी वर्षभर देवघेव करावयाची असत. व्यापारी व त्यांचे दलाल नोकर अती स्वार्थी व्यवहारधंदा वरंग दिसेल त्याप्रमाणे वागण्यात तरबेज असल्यामुळे नुसत्या भावात शेतकऱ्यांचा कमीत कमी शेकडा 25 तोटा होत. याखेरीज हिशोबात, वजनमापात, वर्ताळयात, व्याजात, कसरीत, मनोतीत भोळयात आणि नोकर–दलालांच्या बहाली बक्षीसीत कुणबी जेरीस येत असे.[7]

ग्रामीण भागात चलन व्यवहार जास्त होत नसे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरलेल्या धान्याची खळयावर व सुळी करून सावकार ते विकून जे पैसे येत असत ते शेतकऱ्याने घेतलेले कर्जाऊ रकमातून वजा करीत असत. त्याचा एक नमुना ऐतिहासिक कागदपत्रातून पहावयास मिळतो.[8]

या पत्रावरून ग्रामीण सावकारीचे स्वरूप लक्षात येते. कर्जाचे पैसे वसूल करण्यासाठी बाजारी, कडधान्य, मटकी, कर्डी आदी धान्याच्या रूपाने वसूल करून त्याच्या विक्रीतून जी रक्कम आली ती मूळ कर्जाच्या बदल्यात वसूल करण्यात आली असे दिसते.

व्याजाचा दर :

कर्ज हे सामान्यतः सहा महिने ते वर्षभराच्या लघु मुदतीने दिले जाई. दीर्घ मुदतीची कर्जे फारसे आढळून येत नाही. सहा महिन्यापेक्षा कमी मुदतीची अगदी 15 दिवसांच्या मुदतीची कर्जे दिल्याचीही उदाहरणे आढळतात. लघु मुदतीची कर्जे सामान्यतः शेतकरी अथवा अन्य व्यक्तींना त्यांच्या एका विशिष्ट कालखंडातील उदरनिर्वाहासाठी दिली जात होती.9 अशा कर्जाची परतफेड सुगीनंतर शिमगा अथवा वर्षप्रतिपदेस व्याजासकट करावी लागे. सरकारी कामासाठी काढलेल्या कर्जाची मुदत प्रसंगी एक वर्शाहून अधिक असे. कारण न्यायदरबारात गेलेल्या कामाच्या निर्णयाला विलंब लागत असे. एका व्यक्तीने अशा कामासाठी पाच वर्षाच्या दीर्घ मुदतीचे कर्ज काढले होते.[10]

सावकारी व्यवहारात लघु मुदतीच्या कर्जाचे प्रमाण अधिक असल्याने व्याजाचा दर प्रतिमहा आकारला जाई. कर्ज रूपयात दिले असेल तर व्याजाचा दर शेकडयावर महिन्याला रूपयात आकारला जात असे. कर्ज जर 'होना' च्या रूपाने दिले असेल तर प्रत्येक होनाला दरमहा किती टक्के अथवा रूके व्याज पडेल हे कर्जकतब्यात नमूद केले जात असे.

शिवकालीन मराठी प्रदेशात रूढ असलेले नित्याच्या व्याजाचे दर हे प्राचीन काळापेक्षा निश्चितच जादा होते. चातुर्वण्य व्यवस्थेतील प्रत्येक वर्गाला कशा प्रकारचे दर आकारले जात असत याचा तक्ता उपलब्ध नसला तरी व्याज आकारणी करताना ऋणकोच्या आर्थिक दर्जाचा प्रसंगी विचार केला जात होता असे काही ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते. ऋणकोला सामाजिक प्रतिष्ठा कितीही असली आणि त्याचा आर्थिक दर्जा समाधानकारक नसेल तर कर्ज देताना सावकार पूर्ण विचारांती असे व्यवहार करत असत. व्याजाचा दर आकारताना कर्ज कशासाठी दिले जात आहे आणि ऋणकोचा आर्थिक दर्जा काय आहे याचा प्रामुख्याने विचार केला जात असे. 37 1/2% टक्क्यांपासून 60% दर साल व्याज आकारलेले कागदपत्रात आढळते.11 काही वेहा कर्ज हे ठराविक मुदतीसाठी काढलेले असत नाही. अशा प्रकारच्या व्यवहारात पहिल्या महिन्याच्या व्याजाचा दर नंतरच्या महिन्यापेक्षा अधिक असतो असे दिसते. असे करण्याचे मुख्य कारण पुढच्या महिन्यात कमी व्याज भरावे लागणार म्हणून ऋणको कर्ज फेडण्याची घाई करणार नाही आणि त्यामुळे सावकाराचा फायदाच होईल अशी कदाचित धनकोची भावना असावी. दुसरे कारण अशा प्रकारे बिनामुदतीचे कर्ज देण्यामागे असू शकेल. 17 व्या शतकात किफायतशीर गुंतवणूक करण्याचे विविध मार्ग उपलब्ध नसल्याने एखादा

ऋणको जर ऐपतदार असेल तर असे बेमुदत कर्ज प्रसंगी कमी व्याजाच्या दराने त्यांच्याकडे ठेवणे धनकोला फायद्याचे वाटत असेल. एका धनकोने असे कर्ज देतांना पहिल्या महिन्यासाठी दहा टक्के आणि नंतर कर्ज फिटेपर्यंत दरमहा 5 टक्के दराने कर्ज कदाचित वरील कारणासाठी आकारले असावे.[12]

शेतकऱ्यांना धान्यरूपाने कर्ज साधारणपणे सहा महिन्याच्या मुदतीचे दिले जाई आणि त्याची परतफेड दामदुपटीने करण्याची अट त्याच्यावर लादलेली असे.[13] कर्जाचे व्याज हे त्यांच्या मुदलवर अवलंबून असत. कर्जाची मुदतही जितकी जास्त तितका व्याजाचा दर सामन्यपणे अधिक असत परंतु एका देशमुखाने आपला पाटीलकी देशमुखीचा कब्जा लढविण्यासाठी दरमहा 5 टक्के व्याजदराने दीर्घ मुदतीने कर्ज काढले होते.[14]

कर्जाची फेड कराराप्रमाणे करण्याची नैतिक जबाबदारी ऋणकोवर असे. कारण तसे न करणे हे एक महान पाप असून त्याचे वाईट परिणाम आपल्याला पुढच्या जन्मी भोगावे लागतील अशी एक समजूत समाजात रूढ होती. आणि या अंधश्रध्देचा पुरेपूर फायदा सावकार मंडळी उठवीत. कर्जाची फेड मुदतीत न करणे म्हणजे गोहत्या, ब्रह्महत्या अथवा वाराणसीत मातृगमनासारखे घोर पातक करण्यासारखे आहे असे मानले जाई.

दुर्गोजी पायगुडे याने पुण्याच्या मोरोविठ्ठल होनम देशपांडे यांना कर्जापोटी लिहून दिलेल्या कर्जपत्रात म्हटले आहे की, कराराप्रमाणे कर्जफेड करू. ''आनेचा करू तरी गौहत्या, ब्रह्महत्या व वाराणसीस मात्रागमन केलियासी सफेत आसे.''

मिरासवतन तारण ठेवून कर्ज काढले असेल आणि त्याची फेड जर करता आली नाही तर ते वेतन सावकार गिळंकृत करील अशी सारखी भीती कर्जदाराला वाटत असे. कारण वतन हे वशंपरंपरा असे आणि ते एक सामाजिक प्रतिष्ठेचे गमक होते.

तगाई अथवा सरकारी कर्ज :

17 व्या शतकात सरकारी उत्पन्नाची प्रमुख बाब म्हणजे शेती व्यवसाय आणि त्याच्या उत्तेजनार्थ शिवकालात जातीने प्रयोग झाले असावेत असे म्हणावयास काही पुरावा आहे. गरजू शेतकऱ्यांना, शेतकीचा व्यवसाय निर्वेधपणे करता यावा. त्याला आवश्यक ती शेतीची अवजारे खरेदी करता यावीत अथवा पेरणी ते सुगी हा मधला काळ त्याच्या जीवनात अत्यंत हलाखीचा असतो. त्या काळात उदरनिर्वाहासाठी काही सहाय्य मिळावे या हेतूने शिवाजी राजाने तगाईच्या रूपाने शेतकऱ्यांना बिनव्याजी आर्थिक सहाय्य करण्याची एक योजना प्रश्नावलीच्या सुभेदारापुढे पत्राद्वारे मांडली होती. ती तगाई शेतकऱ्याच्या मगदुराप्रमाणे त्याला परवडतील अशा हप्त्यांनी वसूल करावयाची होती व कोणत्याही परिस्थितीत तगाई वसुलीसाठी त्याची अवजारे अथवा जमीन जप्त करावयाची नव्हती. जमीनदाराच्या वर्चस्वाखाली असलेली रयत मुक्त करून तिच्याशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याच्या मराठी राज्याच्या हेतूचा शेतीविषयक धोरण हा एक महत्त्वाचा भाग होता असे म्हणता येईल.

सरकारी कर्जाचे अस्सल दस्तऐवज आज उपलब्ध नसले तरी तगाईसंबंधी जे तुरळक उल्लेख आढळतात त्यावरून असा निष्कर्ष काढता येईल की शेतीच्या विकासासाठी राजाच्या अंदाजपत्रकात काही योजना असणार की, ज्याजोगे शेतकऱ्याला बिनव्याजी अथवा माफक व्याजाच्या दराने कर्ज मिळून त्यांच्या मेहनतीला उत्तेजन मिळेल. बाजारपेठा वसविण्यासाठी सरकारातून आर्थिक मदत आणि इतर सहाय्यक मिळत असल्याचे काही उल्लेख आढळतात तर शेती या प्रधान व्यवसायाला ते का मिळू नये असा प्रश्न येथे उपस्थित करता येईल आणि त्याचे उत्तर होकारात्मक असेल.[15]

वरात :

पतपेढीचा विचार करताना मध्ययुगात प्रचलित असलेल्या आणखी एका आर्थिक व्यवहाराच्या साधनाचा आपण विचार केला पाहिजे. ते साधन म्हणजे वरात अथवा हुंडी. वरात म्हणजे एखाद्याने त्याची किंवा त्याच्या अधिकारातील रक्कम जिथे असेल किंवा त्याला जिथून काही येणे असेल अशा ठिकाणावर विशिष्ट व्यक्तीला विशिष्ट रक्कम देण्याविषयी काढलेला हुकूम म्हणजे वरात. अर्थात हुंडी ही ड्राफ्टसारखी असते तर वरात चेकसारखी असते. सध्या ज्याप्रमाणे चेक काढणाऱ्याच्या खात्यावर रक्कम नसल्यामुळे किंवा अन्य काही कारणामुळे एखादा चेक वटत नाही त्याचप्रमाणे वरातदेखील ती ज्या ठिकाणावर काढली असेल त्या ठिकाणी रक्कम नसल्याने किंवा रक्कम देऊ नये अशी सूचना वरात काढणाऱ्यानेच आतून देऊन ठेवली असलयाने कधी कधी वटत नसे.[16]

आपल्या अधिकाऱ्यांना शिवाजी राजा वरातीद्वारे पगार देत असे (जसे चेकच्या रूपाने दिला जातो) सभासद बखरीत म्हटले आहे.

''सरनौबतास व मुजुमदारास व कारकुनास व हुजुरातील लोकांस तनखे वरात देत होते.''

इंग्रजांकडून खरेदी केलेल्या वस्तुची किंमत शिवाजी राजाने सॅम्युअल ऑस्टिल या कंपनीच्या अधिकाऱ्याला कल्याण भिवंडीच्या खजिन्यावर 'वरात' काढून दिली होती. अर्थात या पध्दतीबद्दल इंग्रजांनी नाराजी व्यक्त केली आहे. ऑस्टिन म्हणतो की, खजिन्यातून वरातीची रक्कम वसूल करणे इतके सोपे नव्हते. रक्कम देण्याचे मान्य केलेच तर

त्याच्या वसुलीसाठी दोन ते तीन वर्षाचा कालावधी लागत असे. अर्थात राजाला माल पुरविणाऱ्या व्यक्तींना देण्याबाबत होणाऱ्या या विलंबाची पूर्ण कल्पना असणार म्हणूनच माल पुरवताना त्याची किंमत थोडीशी वाढवून दिलेली असणार आणि आपल्या संभाव्य नुकसानाची भरपाई केली असणार. इंग्रजी व्यापारी वरातीला 'अनिश्चित पैसा' मानीत आणि म्हणून मालाची किंमत चांदीच्या नाण्यात कशी मिळेल यासाठी सतत प्रयत्नशील असत.

'वराती' मागोमाग बाजारपेठेत एक नवा मार्ग उदयाला आला तो म्हणजे दलालाचा. कंपनीचे व्यापारी अशा दलालाच्या मार्फत वरातीत नमूद केलेला पैसा त्वरित मिळावा म्हणून काही बक्षिसे देण्याचे मान्य करून 'वरात' वठवून घेत.[17]

असे हे शिवकालीन महाराष्ट्रातील सावकारीचे स्वरूप होते.

1) खरे, ग.ह. आणि जोशी, शं.ना.	शिवचरित्र साहित्य खंड–1 भा.इ.स.मं. पुणे, पृ. क्र. 73
2) तत्रैव	खंड–2, पृ. क्र. 132
3) तत्रैव	खंड–3, पृ. क्र. 951
4) तत्रैव	सा. 3, पृ. क्र. 951
5) प्रा. मारवाडे नरेंद्र	'आज्ञापत्र' कैलास पब्लिकेशन्स्, औरंगाबाद. प्र. आ. 2002, पृ. क्र. 40
6) डॉ. कुलकर्णी, अ.रा.	'शिवकालीन महाराष्ट्र' राजहंस प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1993, पृ. क्र. 176
7) आत्रे, त्रिं.ना.	'गाववाडा' वरदा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 152, 153
8) मेणवली दप्तर	डॉ.बा.आं.म.वि. क्र. 262
9) सरदेसाई, गो.स.	पेशवे दप्तर 31 : 48
10) डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद	मेणवली दप्तर पृ. क्र. 262
11) खरे, ग.ह. आणि जोशी, शं.ना.	शिवचरित्र साहित्य खंड–2, पृ. क्र. 134, 152
12) राजवाडे	खंड–20, 15
13) राजवाडे	खंड–15, 89
14) शिवचरित्र साधने 4:722	
15) डॉ. कुलकर्णी, अ.रा.	'शिवकालीन महाराष्ट्र' पृ. क्र. 179, 180
16) मेहंदळे, ग.भा.	श्री राजा शिवछत्रपती खंड–1, भाग–2, पृ. क्र. 334
17) डॉ. कुलकर्णी, अ.रा.	'शिवकालीन महाराष्ट्र' पृ. क्र. 179, 180

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org